# मिरा भाईंदर महानगरपालिका

**सामान्य प्रशासन विभाग**

मुख्यालय, पहिला मजला, स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.)
दूरध्वनी क्र-022-28192828 ई-मेल आयडी- gad@mbmc.gov.in

जा.क्र. मनपा/ सा.प्र. /315 /2024-25 दि. 12 /02/2025

## ।। परिपत्रक ।।

प्रतिवर्षाप्रमाणे बुधवार **दि. १९ फेब्रुवारी २०२५ रोजी छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती** साजरी करण्यात येणार आहे. त्यानिमित्त प्रतिवर्षाप्रमाणे महानगरपालिका मुख्य कार्यालय, दुसरा मजला येथे सकाळी १०.०० वाजता **मा.श्री. संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से), आयुक्त तथा प्रशासक** यांच्या शुभहस्ते व मा.अति.आयुक्त, उपायुक्त (सर्व), शहर अभियंता, नगरसचिव, अधिकारी/कर्मचारी वर्ग व पत्रकार यांच्या उपस्थितीत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीचा कार्यक्रम संपन्न होणार आहे. त्यानिमित्त सकाळी ०९.०० वाजता घोडबंदर येथील छत्रपती शिवाजी महाराज यांचे अश्वारुढ पुतळयास तसेच सकाळी ०९.३० वाजता एम.टी.एन.एल. भाईंदर (प.) समोर भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळयांस पुष्पहार अर्पण करणे. तद्नंतर सकाळी ०९.४५ वाजता महानगरपालिका मुख्य कार्यालयाचे समोरील प्रांगणात छत्रपती शिवाजी महाराज यांचे पुतळयास व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे अर्धाकृती पुतळयांस पुष्पहार अर्पण करण्याचा कार्यक्रम आयोजित केला आहे.

तसेच महानगरपालिका मुख्य कार्यालय दुसरा मजला येथे सकाळी ठिक १०.०० वाजता छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस **मा.श्री. संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से), आयुक्त तथा प्रशासक** यांचे शुभहस्ते पुष्पहार अर्पण करण्यात येणार आहे. तसेच शासन निर्णयानुसार छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून "जय जय महाराष्ट्र माझा, गरजा महाराष्ट्र माझा" या राज्यगीताचे वादन करण्यात येईल.

तरी सदर कार्यक्रमास आपण उपस्थित राहणेबाबत विनंती आहे.

**उपायुक्त (मु.)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

Signed by
Kalpita Kishor Pimple
Date: 11-02-2025 18:35:25

**प्रति,**
**माजी पदाधिकारी/नगरसेवक**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**